आर.सी.सी. क्र.३३५/२०२१

नि.क्र.२१

**<u>सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र. ५ यांचा पुरावा</u>**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

माझे नांव – मनिषा बबन चव्हाण

वय – ३९ वर्षे, व्यवसाय – नोकरी (म.पो.हवालदार)

नेमणुक–पारनेर पो.स्टे.

**<u>सरतपासणी सहा. सरकारी अभियोक्ता श्री.एस.ए.पटेकर यांचेमार्फत</u>**–

सन २०१८ ते आजपावेतो मी पारनेर पो.स्टे. येथे कार्यरत आहे. दि.४.३.२०२१ रोजी मी पोलीस नाईक असताना गु.र.नं.१४१/२०२१ चा तपास माझ्याकडे फिर्याद वरील लेखी आदेशान्वये माझ्याकडे ठाणे अंमलदार यांनी दिला. त्यासोबत माझ्याकडे दैनिक अहवाल, एफआयआर व फिर्याद प्राप्त झाले. फिर्यादीचे अवलोकन केल्यानंतर मी घटनास्थळ पंचनामा तयार केला. घटनास्थळ पुजारी मळा फिर्यादी यांचे घरासमोर होते व पंचनामा मारहाण संदर्भात होता. फिर्यादीने सांगितल्याप्रमाणे मी पंचनाम्यात लिहुन घेतले. घटनास्थळी मी एक लाकडी काठी साधारण साडे तीन फुटाची जप्त केली. आता मला नि.२० वरील घटनास्थळ पंचनामा दाखवण्यात आला. त्यावर माझी व पंचांची सही असुन त्यातील मजकुर बरोबर आहे. फिर्यादीच्या राहत्या घराचा मी उतारा घेतला, साक्षीदारांचे जबाब त्यांचे सांगण्याप्रमाणे घेतले. राजेंद्र पुजारी यांचा दि.५.३.२०२१ चा जबाब मी त्यांच्या सांगितल्याप्रमाणे नोंदवला होता. त्यानंतर आरोपीला हजर राहण्यासाठीसमजपत्र देवुन जखमी तुकाराम पुजारी व सुभद्राबाई पुजारी यांचे वैद्यकीय प्रमाणपत्र हस्तगत केले. त्याबाबत मी दि.६.३.२०२१ रोजी ग्रामीण रुग्णालय पारनेर यांना पत्र दिले होते. ते पत्र मला आता दाखवण्यात आले. त्यातील मजकुर बरोबर असुन त्यावर माझी सही आहे. त्यास **नि.२२** देण्यात येते. तपासात निष्पन्न झाले की वाल्याच्या शेंगा वाळु घातलेल्या असताना त्या खाली कोणी पाडल्या या कारणावरुन आरोपींना विचारपुस केली असता आरोपींनी फियादीस लाकडी काठीने व फिर्यादीच्या आईस लाथाबुक्क्याने मारहाण केली. आता मला आर्टीकल अ वरील काठी दाखवण्यात आली. ती काठी मी जप्त केली होती व त्यावर माझी सही आहे. आरोपी आजरोजी

न्यायालयात हजर आहेत.

**<u>आरोपींतर्फे उलटतपास विधीज्ञ श्री.बी.एम.पठारे यांच्यामार्फतः</u>**

घटना दि.४.३.२०२१ रोजी सकाळी १० वाजता घडली. त्यादिवशी ती घटना एकदाच सकाळी १० वाजता घडली. फिर्याद किती वाजता नोंदवली हे माहीती नाही. हे म्हणणे खरे आहे की फिर्याद नोंदवण्यास उशीर का झाला याचे कारण फिर्यादीत नमुद नाही.

प्रश्न– घटना सकाळी १० वाजता घडल्याचे व परत येताना फिर्यादीच्या आईस आरोपींनी शिवीगाळ केल्याचे फिर्यादीत नमुद आहे का?

उत्तर– नमुद आहे.

प्रश्न– तसेच आईने विचारले असता की घमेले कोणी फोडले यावर भावाने शिवीगाळ केली हे फिर्यादीत नमुद आहे का?

उत्तर– नमुद आहे.

प्रश्न– तसेच फिर्याद देतेवेळी फिर्यादीने आईस काय झाले असे विचारले असता आरोपीने मला काठीने मारले व जिवे मारण्याची धमकी दिली असे फिर्यादीत नमुद आहे का?

उत्तर– नमुद आहे.

प्रश्न– तसेच फिर्यादीत फिर्यादीच्या आईस फिर्यादीच्या भावाने कानाखाली मारले असे नमुद आहे का?

उत्तर– नमुद नाही.

प्रश्न– तसेच फिर्यादीत फिर्यादीने आरोपींना कशाला मारले असे विचारले असता आरोपींनी फिर्यादीस मारहाण केल्याचे नमुद आहे का?

उत्तर– हे मला सांगता येणार नाही.

प्रश्न– सा.क्र.२ वंदना पुजारी यांनी तुमच्या समोर जबाब देताना माझ्या सासुने घमेल्यामध्ये वाल ठेवले होते व घमेले फुटले होते असे तुम्हाला सांगितले होते का ?

उत्तर– नाही. घमेल्यात वाल ठेवले होते व घमेले पडलेले होते व त्यामध्ये माती कालवुन ठेवली होती असे सांगितले होते.

प्रश्न– सा.क्र.२ वंदना पुजारी यांनी तुमच्या समोरील जबाबात माझ्या दिराने माझ्या सासुस तोंडात मारले होते असे सांगितले होते का?

उत्तर– नाही.

प्रश्न– सा.क्र.२ वंदना पुजारी यांनी तुमच्या समोरील जबाबात माझ्या पतीने माझ्या आईस का मारले असे दिराला विचारले असे सांगितले होते का?

उत्तर– नाही.

हे म्हणणे खरे नाही की राजेंद्र पुजारी यांचा जबाब मी त्यांच्या सांगितल्याप्रमाणे नोंदवला नाही. घटनास्थळाला मी दि.५.३.२०२१ रोजी सकाळी ९ ते १० वाजता गेले होते व मी घटनास्थळाची व्यवस्थीत पाहणी केली होती. हे म्हणणे खरे आहे की घटनास्थळी मला घमेले, वाल व माती असे दिसुन आले नसल्याने मी ते पंचनाम्यात नमुद केले नाही. हे म्हणणे खरे आहे की घटनास्थळी घटना घडल्याच्या कोणत्याही खाणाखुणा नव्हत्या. हे म्हणणे खरे आहे की प्रशांत बेलोटे हा पंचनाम्यातील पंच असुन तो फिर्यादीच्या पत्नीचा भाऊ आहे व तो देवीभोयरे येथे राहतो. हे म्हणणे खरे नाही की मी जाणीवपुर्वक त्यास हितसंबंधी साक्षीदार (इंटरेस्टेड विटनेस) म्हणुन घेतले आहे. हे मला सांगता येणार नाही की दुसरा पंच गणेश शेटे हा फिर्यादीच्या पत्नीचा मावस भाऊ आहे. हे म्हणणे खरे नाही की दोन्ही पंच मी हितसंबंधी साक्षीदार म्हणुन घेतले आहे. आर्टीकल अ वरील काठी मी पंचनाम्यावेळी घटनास्थळावरुन जप्त केली. हे म्हणणे खरे आहे की आर्टीकल अ वरील काठी मी पाहीली असता त्यावर पंचांच्या सहया नाहीत. हे म्हणणे खरे नाही की आर्टीकल अ वरील काठी मी घटनास्थळावर जप्त केली नाही.

प्रश्न– पंचांचे लेबल काठीवर नसल्यामुळे तुम्ही काठी घटनास्थळावरुन जप्त केल्याचे खोटे सांगत आहात?

उत्तर– नजरचुकीने ते राहीले.

हे म्हणणे खरे नाही की पंचांचे लेबल काठीवर नसल्यामुळे मी घटनस्थळावरुन काठी जप्त केल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की मी घटनास्थळ पंचनामा पंचांसमक्ष केला नाही. हे म्हणणे खरे नाही की मी घटनास्थळी जावुन घटनास्थळ पंचनामा केल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की साक्षीदाराच्या सांगण्याप्रमाणे मी जबाब घेतले असल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की माझ्या तपासात वाल्याच्या शेंगा वाळु घातलेल्या असताना त्या खाली कोणी

पाडल्या या कारणावरुन आरोपींना विचारपुस केली असता आरोपींनी फियादीस लाकडी काठीने व फिर्यादीच्या आईस लाथाबुक्क्याने मारहाण केली असल्याचे निष्पन्न झाल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की वैद्यकीय अधिकारी यांना पत्र देवुन मी वैद्यकीय प्रमाणपत्र हस्तगत केल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की मी खोटा तपास केला आहे व खोटे दोषारोपपत्र दाखल केले आहे. हे म्हणणे खरे नाही की मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास संपला.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृती.

NILESH SHRIPAL SABNIS

Digitally signed by NILESH SHRIPAL SABNIS
Date: 2025.09.09 11:38:15 +0530

(एन.एस.सबनीस)

दिनांकः ०८/०९/२०२५.

न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग, कोर्ट नं.२,
पारनेर.